‘रोहिंग्या मुस्लिम प्रश्नाचा भारताच्या दृष्टिकोनातून अभ्यास’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखा अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील

पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

संशोधक

दत्तात्रय भानुदास जाधव

(एम. ए., एम. फिल, सेट, राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. पंजाब चव्हाण

प्राचार्य, दिगंबरराव बिंदू कॉलेज, भोकर

ता. भोकर, जि. नांदेड

मे २०१९

रोहिंग्या मुस्लिम प्रश्नाचा भारताच्या दृष्टिकोनातून अभ्यास

विषय प्रवेश :

म्यानमारमधील रखाइन (अराकन) प्रांतात राहणाऱ्या रोहिंग्या मुस्लिमांवर होत असलेल्या अन्याय-अत्याचारांमुळे या प्रश्नाची जगभरात चर्चा सुरू आहे. रखाइन प्रांत भौगोलिकदृष्ट्या बांगलादेशाच्या सीमेजवळ आहे. ३६ हजार ७६२ चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेल्या रखाइनची लोकसंख्या जवळपास २१ लाख आहे. त्यापैकी २० लाख बौद्ध आणि सुमारे २९ हजार मुस्लिम आहेत. म्यानमारमधील २०१४च्या जनगणनेनुसार रखाइनमधील सुमारे दहा लाख लोकसंख्येचा समावेश जनगणनेत करण्यात आला नाही. जनगणनेत समावेश नसलेले दहा लाख रोहिंग्या मुस्लिम आहेत.

दुसऱ्या महायुद्धात रखाइन प्रांत जास्त सक्रिय होता. रोहिंग्यांनी ब्रिटिशांच्या बाजूने लढा दिला होता. म्यानमारच्या स्वातंत्र्य चळवळीतही रोहिंग्या सक्रिय नव्हते आणि त्यांनी ब्रिटिशांची बाजू घेतली होती. याचाच अर्थ त्यावेळच्या ब्रिटिशविरोधी लढ्यामध्ये ते म्यानमारच्या विरोधात होते. त्यामुळे, बौद्ध बहुसंख्याक असणाऱ्या या देशातील प्रस्थापित जनभावनेविरोधात रोहिंग्यांनी ब्रिटिशांची बाजू घेतल्याने, रोहिंग्यांविषयी म्यानमारच्या बौद्ध जनतेमध्ये पहिल्यापासून रोष आहे. १९४७मध्ये म्यानमारच्या नव्या संघराज्यात विविध जाती समूहांना एकत्र आणण्यासाठी 'पांगलाँग वार्ता' आयोजित करण्यात आली होती. या चर्चेसाठी रोहिंग्या मुस्लिमांना बोलविण्यात आले नव्हते. १९५०च्या दशकात रोहिंग्यांना म्यानमारचे नागरिक म्हणून मान्यता देण्यासाठी करार करण्याचे प्रयत्न सुरू होते. तत्कालीन यू नु सरकारने म्यानमारमधील १४४ जातीसमूहांची नोंदणी केली होती. मात्र, जनरल नेविन यांनी त्यातून अनेक समुहांना बाहेर काढून यादीत फक्त १३५ जाती समूहांना ठेवले. वगळलेल्या समूहात रोहिंग्यांचा समावेश होता, याच ठिकाणी आजच्या रोहिंग्यांच्या प्रश्नाचे मूळ आहे.

रखाइनमध्ये मोंगडाव, बुथीडोंग आणि राथेडोंग या उपनगरांत रोहिंग्यांची लोकसंख्या मोठी आहे. रखाइन प्रांतातच रोहांग नावाचे एक गाव आहे, या गावात मुस्लिमांची लोकसंख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे रोहांग गावाच्या नावावरून रोहिंग्या हे नाव पडले आहे. १९४८मध्ये रोहिंग्यांना कोणताही कायदा लागू नव्हता. परदेशी कायदा (इंडियन ॲक्ट ३,१८४६), रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्ट (बर्मा ॲक्ट ७, १९४०) आणि रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स रुल्स (१९४८), हे कायदे म्यानमारच्या स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर देशात येणाऱ्या परदेशी नागरिकांच्या नोंदणीसाठी होते. मात्र, हे कायदे रोहिंग्यांना लागू नव्हते. त्यामुळे म्यानमारमध्ये विदेशी नागरिक म्हणून रोहिंग्याची नोंदणी झाली नाही; पण, रोहिंग्यांना नागरिक मानून राष्ट्रीय कोट्यातून उत्तर रखाइन प्रांतातून

एक प्रतिनिधी निवडला जायचा. १९४६मध्ये जनरल आंग सान (आंग सान सू ची याचे वडील) यांनी रोहिंग्या मुस्लिमांना पूर्ण अधिकार देण्याची आणि कोणताही भेदभाव होणार नाही, अशी हमी दिली होती. मात्र, त्यांनी दिलेली हमी पाळली नाही. १९६२मध्ये सत्तेवर आलेल्या जनरल नेविन यांनी रोहिंग्यांच्या सामाजिक आणि राजकीय संघटना उद्ध्वस्त केल्या. १९७७मध्ये सैन्याने सर्व नागरिकांची नोंदणी केली. मात्र, रोहिंग्याची केली नाही, त्यामुळे १९७८मध्ये दोन लाखांहून अधिक रोहिंग्यांना बांगलादेशात आश्रय घ्यावा लागला. त्यानंतरही विविध कारणांमुळे १९९१ आणि २०१७ मध्ये त्यांना मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करावे लागले.

म्यानमारमधील रोहिंग्या-बौद्ध संघर्ष

स्वातंत्र्यापूर्वी भारतातून (आजच्या बांगलादेशातून) रोजगारासाठी काही मुस्लिम आणि हिंदू मजूर रखाइन प्रांतात स्थायिक झाल्याचे मानले जाते. याच मुस्लिमांना रोहिंग्या मानले जाते, ते संख्येने जास्त असल्यामुळे म्यानमार सरकारने त्यांना नागरिकत्व देण्यास नकार दिला. अनेक पिढ्यांपासून म्यानमारमध्ये राहत असूनही नागरिकत्व देण्यात आलेले नाही, असा रोहिंग्यांचा आरोप आहे. रखाइन प्रांतात रोहिंग्या, हिंदू आणि बौद्ध धर्माचे लोक राहतात. हिंदू संख्येने अगदीच अल्प आहेत. शिवाय हिंदू-बौद्ध, हिंदू-मुस्लिम, असा संघर्ष तिथे झाल्याचा इतिहासात फारसे पुरावे नाहीत. मात्र, रोहिंग्या-बौद्ध, असा संघर्ष सतत सुरू आहे. रोहिंग्यांचा स्थानिक बौद्ध आणि म्यानमारच्या सैन्यातील संघर्ष चिघळल्यामुळे २५ ऑगस्ट २०१७ रोजी रोहिंग्या मूलतत्त्ववाद्यांनी उत्तर रखाइनच्या पोलिस चौकीवर हल्ला केला होता. त्यात बारा पोलिसांचा मृत्यू झाला होता. त्या हल्ल्यानंतर म्यानमारच्या सैनिकांनी रोहिंग्या मुस्लिमांविरोधात अत्यंत क्रूरपणे मोहीम राबविण्यास सुरुवात केली. त्यामुळे रखाइममधून रोहिंग्यांचे भारत आणि बांगलादेशाकडे अवैध स्थलांतर सुरू आहे. रोहिंग्यांना पळवून लावण्यासाठी म्यानमारच्या सैनिकांनी त्यांची गावे, वस्त्या जाळल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, रखाइनमध्ये रोहिंग्या मुस्लिमांनी तेथील स्थानिक बौद्ध आणि हिंदूंवर अत्याचार केल्याची माहिती आता पुढे येऊ लागली आहे.

‘डॉक्टर्स विदाउट बॉर्डर्स’ या स्वयंसेवी संघटनेने जाहीर केलेल्या अहवालानुसार, ऑगस्ट २०१७मध्ये रखाइन प्रांतात सुरू झालेल्या हिंसाचारात ऑगस्ट-डिसेंबर २०१७ या काळात ६७,००० रोहिंग्या मुस्लिमांचा मृत्यू झाला आहे. मात्र, म्यानमार सरकारने अधिकृतरित्या केवळ ४०० रोहिंग्यांचा मृत्यू झाल्याचे म्हटले आहे. म्यानमारच्या सैनिकांनी रोहिंग्यावर अत्यंत क्रूर अत्याचार केल्याने ऑगस्ट-डिसेंबर २०१७ या काळात रखाइन प्रांतातून बांगलादेशात शरणार्थी म्हणून गेलेल्या रोहिंग्यांची संख्या सहा लाखांवर गेली आहे. याच काळात हिंसाचारात नऊ हजार रोहिंग्यांचा मृत्यू झाला आहे. हा आकडा कितीही कमी केला, तरी तो ६७००च्या खाली येणार नाही. त्यात पाच वर्षांहून कमी वयाच्या ७३० मुलांचा समावेश आहे, असेही ‘डॉक्टर्स विदाउट बॉर्डर्स’ या स्वयंसेवी

संस्थेने म्हटले आहे. सध्या रखाइनमध्ये असणाऱ्या अनेक निर्वासित छावण्यांमध्ये रोहिंग्या राहत आहेत. 'रॉयटर्स' या वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, देशत्याग केलेल्या रोहिंग्याची एकूण संख्या सुमारे ८-११ लाखांच्या घरात आहे. फक्त बांगलादेशात नोंद झालेल्या रोहिंग्या निर्वासितांची संख्या ३२ हजार आहे, तर नोंदणी न झालेल्या पण सरकारी छावण्यांत राहणाऱ्या निर्वासितांची संख्या सुमारे चार लाखांच्या घरात आहे. भारतात ४० हजार निर्वासित रोहिंग्या आहेत. या शिवाय संयुक्त राष्ट्रांच्या 'हाय कमिशनर फॉर रिफ्युजीज'च्या अंदाजानुसार मलेशिया, इंडोनेशिया आणि थायलंड या देशांत आश्रय घेतलेल्या रोहिंग्यांची संख्या २५ हजारांच्या घरात आहे.

म्यानमारमध्ये बौद्ध बहुसंख्य आणि रोहिंग्या मुस्लिम अल्पसंख्याक (एकूण लोकसंख्येच्या चार टक्के) आहेत. म्यानमारमध्ये '९६९' नावाचा गट धार्मिक असंतोष पसरविण्याचे काम करीत आहे. त्याचे नेतृत्व आसिन बेराथु नावाचा बौद्ध भिख्खू करतो आहे. त्याला धार्मिक भावना भडकविण्याच्या आरोपाखाली २००३मध्ये शिक्षा झाली होती. २०१२मध्ये त्यांची सुटका झाली. २०१३च्या मार्च महिन्यात मेकटिला प्रांतात मुस्लिमांवर एका जमावाने हल्ला केला होता, त्यात ४० लोकांचा मृत्यू झाला होता. २०१३मध्ये रंगूनमध्ये एका मुस्लिम मुलीची सायकल एका बौद्ध भिख्खूला धडकली, त्या नंतर हिंसाचार झाला होता. मागील काही वर्षांत मलेशिया, बांगलादेश, इंडोनेशियामध्ये बौद्धांवर हल्ले झाले आहेत. जकार्तामध्ये बौद्ध केंद्र बॉम्बस्फोट करून उडवून दिले गेले होते. त्यामुळे बौद्धांमध्ये मुस्लिमांविषयी अविश्वास वाढला आहे. म्यानमारमध्ये भारतातून मुस्लिमांना मजूर म्हणून आणले गेले होते. या भारतीयांना परत पाठवा, या मागणीसाठी १९३०मध्ये म्यानमारमध्ये भारतीयांविरोधात दंगे झाले होते. म्यानमारमधील ख्रिश्चन आणि रोहिंग्यांना बेकायदा बांगलादेशी प्रवासी मानले जाते. १९८२च्या नागरिकता नियमानुसार, त्यांचा म्यानमारमधील अधिवास बेकायदा आहे. म्यानमारच्या १९८२च्या नागरिकता कायद्यानुसार, नागरिकत्वासाठी अर्ज करणारा अधिकृत १३५ जातीय समूहांपैकी नसेल तर त्याला नागरिकत्व मिळत नाही. या कायद्याने रोहिंग्यांना नागरिकत्व नाकारले गेले, परिणामी बौद्ध आणि रोहिंग्यांधील दरी रुंदावत गेली. रोहिंग्याच्या वाढत्या प्रभावाला वेळीच न रोखल्यास भारत आणि इंडोनिशियासारखे आपले अस्तित्व संपून जाईल, अशी भीती स्थानिक बौद्धांना आहे. रखाइनमधील अरखनीज बौद्धांची अशीच धारणा आहे. मुस्लिम येथे श्रीमंत असल्याने जमिनीची खरेदी करीत आहेत. रोहिंग्यांनी स्थानिक बौद्ध मुलींशी लग्न करण्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. लग्नासाठी स्थानिक मुलींना धर्मांतर करण्याची सक्ती केली जाते. रखाइनमध्ये मोठ्या संख्येने मशिदी बांधल्या जात आहेत. चांगली घरे, बंदुका, शस्त्रे खरेदी केली जात असल्याने बौद्धांना त्यांच्याविषयी संशय वाढला आहे. त्यातून रोहिंग्याच्या संपत्तीचे नुकसान केले जात आहे. हिंदू किंवा ख्रिश्चनांच्या परंपरा बौद्धांसाठी फारशा गैरसोयीच्या नाहीत. मात्र, मुस्लिमांच्या प्रथा, परंपरा बौद्धांच्या विरोधात

असल्याचे मानले जात आहे. रोहिंग्या स्तूपांच्या जमिनींवर अतिक्रमण करीत आहेत, असा आरोप करून म्यानमारमध्ये कट्टर बौद्ध राष्ट्रवादाचा प्रसार-प्रचार केला जात आहे. '९६९' चळवळीने या प्रकारच्या राष्ट्रवादाला खतपाणी घातले आहे.

'अराकन रोहिंग्या साल्वेशन आर्मी'ने (एआरएसए) २५ ऑगस्ट २०१७ रोजी म्यानमारच्या रखाइन प्रांतातील ३० पोलिस चौक्यांनी लक्ष्य केले होते. दहा पोलिस अधिकारी, एक सैनिक आणि एका इमिग्रेशन अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्यानंतर म्यानमारने 'एआरएसए'ला दहशतवादी संघटना घोषित करून कारवाई सुरू केली होती. या कारवाईला 'क्लियरन्स ऑपरेशन' असे नाव दिले होते. या मोहिमेमुळे सुमारे तीन लाख रोहिंग्या विस्थापित झाले. १० सप्टेंबरला 'एआरएसए'ने एक महिन्याचा शस्त्रसंधी जाहीर केली. पण, म्यानमार सरकारने शस्त्रसंधी फेटाळून लावून कारवाई सुरूच ठेवली. दहशतवाद्यांशी कोणताही चर्चा केली जाणार नाही, अशी भूमिकाच त्यांनी घेतली होती. आंतराष्ट्रीय दबाव वाढल्यानंतर म्यानमारचे राष्ट्रपती अर्दोआन यांनीही 'रखाइनमधील लोकांना वाचविण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले जातील. लोकशाहीत असलेले मानवाधिकारांचे महत्त्व आम्ही जाणतो. सर्व नागरिकांना त्याचे सामाजिक, राजकीय अधिकार मिळतील, मिळतील याची आम्ही काळजी घेऊ,' असे म्हटले होते.

दरम्यान, प्रसिद्ध मानवतावादी नेत्या आणि शांततेसाठी नोबेल पुरस्कारासह अनेक जागतिक पुरस्कार मिळविलेल्या आंग सान सू की यांनी मूलतत्त्ववाद्यांविरुद्धची कारवाई संबोधून रोहिंग्यावरील अत्याचाराचे समर्थन केले आहे. रोहिंग्या हिंसाचाराबाबत सू की यांनी बोटचेपी भूमिका घेतल्याबद्दल टीका होऊ लागली. जगभरातून टीका होऊ लागल्यानंतर त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या एका महासभेला उपस्थित राहणे टाळले. रोहिंग्यांवरील हिंसाचार रोखण्यासाठी सू की यांच्यावरील दबाव वाढला आहे. पण, म्यानमारमध्ये त्या किती प्रभावशाली आहेत, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. ६ सप्टेंबर २०१७ रोजी पहिल्यांदा सू की यांनी रोहिंग्यांविषयी पहिल्यादा मत व्यक्त केले. 'रखाइन प्रांतात राहत असलेल्या सर्व लोकांना वाचविण्याचा प्रयत्न म्यानमार करीत आहे. रखाइनमध्ये मुस्लिमांचा नरसंहार झालेला नाही. ज्यांना रखाइनमध्ये पुन्हा यायचे आहे, त्यांचे म्यानमार स्वागत करेल,' असेही त्या म्हणाल्या होत्या. मात्र, त्यानंतरही म्यानमारच्या धोरणात फारसा परिणाम झालेला दिसत नाही. शिवाय, आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचे विधान कोणी फारसे गांभीर्याने घेतलेले दिसत नाही.

रोहिंग्या प्रश्नावर आंतरराष्ट्रीय समुदाय म्यानमारवर फारसा दबाव टाकू शकला नाही. अमेरिका, ब्रिटनसारख्या देशांनी म्यानमारवर कोणताही ठोस कारवाई न केल्याने म्यानमारचा रोहिंग्यांवरील अन्याय, अत्याचार सुरूच आहे. रोहिंग्या प्रश्नी संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस एंटोनियो गुटेरेस यांनी थोडी खंबीर भूमिका घेतल्याचे दिसत आहे. 'म्यानमारमधील रोहिंग्या मुस्लिम मानवनिर्मित आपत्तीचा सामना करीत आहेत. रोहिंग्यांच्या घरांवर सुरक्षा दलांकडून होत असलेल्या हल्ल्यांचे कोणत्याही परिस्थितीत

समर्थन केले जाऊ शकत नाही. म्यानमारच्या सौनिकांकडून होत असलेले हल्ले तत्काळ थांबविण्यात यावेत,' अशी मागणी ही त्यांनी केली होती. संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासित संस्थांच्या म्हणण्यानुसार, 'बांगलादेशातील आपत्कालिन शिबिरात राहत असलेल्या रोहिंग्या शरणार्थींना मिळत असलेली मदत अपुरी आहे. त्यामुळे जागतिक समुदायांनी मदतीसाठी पुढे यावे. बांगलादेशात शरणार्थी म्हणून आलेल्या रोहिंग्याची लोकसंख्या चार लाखांच्या घरात आहे. शिबिरात येणाऱ्या महिला आणि मुले अर्धपोटी आणि कुपोषित अवस्थेत येताना दिसत आहेत.' संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार आयुक्त जेड राड अल हुसैन यांनी ही रोहिंग्याप्रश्नी म्यानमारवर कडक टीका केली होती. रखाइनमध्ये जातीय नरसंहार केला जात आहे. म्यानमार सरकारने ही क्रूर कारवाई तत्काळ थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या प्रकरणी आंतराराष्ट्रीय न्यायालयात गुन्हा दाखल होण्याची शक्यता कमी आहे. कारण, म्यानमारने रोम करारावर स्वाक्षरी केली नाही, त्यामुळे आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे आदेश मान्य करणे म्यानमारवर बंधनकारक नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय न्यायालयात गुन्हा खटला करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या पाच कायमस्वरूपी देशांची समंती घ्यावी लागणार आहे. मात्र, कायम सदस्य असलेल्या चीनने रोहिंग्याप्रश्नी म्यानमारला समर्थन दिलेले असल्याने चीन सुरक्षा समितीत म्यानमारविरोधी प्रस्ताव मंजूर होऊ नये, यासाठी नकाराधिकार वापरण्याची शक्यता आहे.

संशोधन प्रश्न आणि त्याचे परिमार्जन

रोहिंग्या मुस्लिम प्रश्नाचा मानवाधिकाराच्या दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणावर अभ्यास झाला आहे. पण, या प्रश्नांवर भारताच्या दृष्टिकोनातून अभ्यास झाला नाही. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासात रोहिंग्या मुस्लिम प्रश्नाचा भारताच्या अंतर्गत आणि बाह्यसुरक्षा, विविध विकासकामांवर पडणारा प्रभाव, प्रादेशिक आणि जागतिक सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अभ्यास केला जाणार आहे. भारतात सुमारे चाळीस हजार आणि बांगलादेशात सुमारे सात लाख बेकायदा रोहिंग्या मुस्लिमांनी आश्रय घेतला आहे. बांगलादेशात मोठ्या संख्येने रोहिंग्यांनी आश्रय घेतल्याने तेथील पायाभूत सोयी-सुविधा कोलमडून पडल्या आहेत. शिवाय काही मूलतत्त्ववादी रोहिंग्यांचा जमात-उद-मुजाहिदीन (जेएमबी, बांगलादेश) संघटनेशी संबंध असल्याचे आढळून आले आहे. त्याचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम भारतावर होणार आहे. भारतात राहत असलेले रोहिंग्या जम्मू, हैदराबाद, दिल्लीनजीक तात्पुरते स्थायिक झाले आहेत. या रोहिंग्यांचा पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याचे समोर आले आहे. हे रोहिंग्या मुस्लिम भारताच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेला मोठे आव्हान ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे रोहिंग्या मुस्लिम प्रश्नाचा भारताच्या दृष्टिकोनातून अभ्यास करून प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे? हा प्रश्न किती गंभीर आहे? त्याला कोणकोणते आयाम आहेत, याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत अभ्यास विषय निवडला आहे.

संशोधनाचे महत्त्व

'भारत रोहिंग्या मुस्लिमांना पुन्हा म्यानमारला पाठवेल,' अशी घोषणा पाच सप्टेंबर २०१७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृह राज्यमंत्री किरेन रिजिजू यांनी अशी घोषणा केली होती आणि या प्रश्नावर केंद्र सरकारकडून आलेली ही पहिली भूमिका होती. त्यानंतर भारतात रोहिंग्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली. भारताच्या या भूमिकेला अंतर्गत सुरक्षा, प्रादेशिक सुरक्षा, परराष्ट्र धोरण, हिंदुत्ववादी विचारसणी आणि देशातील अवैध घुसखोरांचा प्रश्न, असे अनेक आयाम आहेत.

म्यानमार भारताच्या पराराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा देश आहे. १८८६मध्ये ब्रिटिशांनी ब्रह्मदेश जिंकला व भारतीय साम्राजाचा एक प्रांत म्हणून पूर्व बंगालला जोडला. तेव्हापासून बंगाल आणि ब्रह्मदेश यांचा व्यापार व्यवसाय वा नोकरी-धंदा अशा विविध पातळ्यांवर अभिसरण सुरू झाले. सध्या भारताच्या दृष्टीने म्यानमार आग्नेय आशियाचे प्रवेशद्वार आहे. म्यानमारमध्ये चीनचा प्रभाव पहिल्यापासूनच वाढलेला आहे. त्यामुळे म्यानमारबाबत भारत आता आणखी उशीर करू शकत नाही. बौद्ध धर्म भारत-चीन-म्यानमारला जोडणारा दुवा आहे. १९९०च्या दशकात म्यानमार आणि चीन संबंध मैत्रीपूर्ण होऊन भारत मागे पडला. म्यानमारमधील चीनचा प्रभाव कमी करण्यासाठी भारताने रोहिंग्याप्रश्नी म्यानमारला पाठिंबा दिला आहे. रोहिंग्याप्रश्नी भारताची-बांगलादेश बरोबरही चर्चा सुरू आहे. भारतात अवैध घुसखोर म्हणून राहणाऱ्या रोहिंग्यांची एकूण लोकसंख्या ४० हजारांच्या घरात आहे. त्यात १६ हजार कायदेशीर शरणार्थींचा समावेश आहे, त्यांची नोंदणी संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासित एजन्सींकडे झालेली आहे. भारतात १९७०पासून रोहिंग्या येत आहेत आणि देशाच्या विविध भागात बेकायदा स्थायिक झाले आहेत. त्यातील बहुतांश हंगामी कॅम्पमध्ये राहत आहेत. रोहिंग्यांना परत पाठविण्याच्या भारत सरकारच्या योजनेविषयी काही जणांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. सरकारने कोर्टात आपली भूमिका स्पष्टपणे जाहीर केली. 'काही रोहिंग्यांचा थेट आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांशी संबध आहे. त्यातील काही संघटना पाकिस्तानातील आहेत. शिवाय येथे राहणारे रोहिंग्या बेकायदा घुसखोर असून, राष्ट्रविरोधी आणि बेकायदा कारवायांमध्ये सक्रिय आहेत, ते धार्मिक तणाव आणि अस्थिरतेचे कारण होऊ पाहत आहेत,' असे सरकारने सांगितले होते. सुप्रीम कोर्टात रोहिंग्या प्रश्नी सुनावणी सुरू आहे. दरम्यान, जम्मू (दहा हजार), दिल्ली (चार हजार), हैदराबाद (सहा हजार) ही भारतातील रोहिंग्या मुस्लिम सर्वाधिक संख्येने राहणारी काही ठिकाणी आहेत. हैदराबाद येथील एक स्थानिक महिला रोहिंग्यांना बेकायदा आधार कार्ड आणि मतदान ओळखपत्र काढून देताना आढळून आली होती. त्या प्रकरणी तिच्यासह तीन रोहिंग्यांवर गुन्हाही दाखल झाला आहे.

देशांतर्गत सुरक्षेचा प्रश्नही महत्त्वाचा बनला आहे. म्यानमारमधील विद्रोही संघटना 'अराकन रोहिंग्या साल्वेशन आर्मी' (आरसा) या संघटनेच्या धोक्याकडे दुर्लक्ष करून

चालणार नाही. या दहशतवादी गटात सुमारे ६०० हत्यारबंद तरुण आहेत. बांगलादेशाने या माहितीला दुजोरा दिला असून, 'आरसा' बांगलादेशातील जमात-उल मुजाहदीन (जेएमबी) या संघटनेच्या संपर्कांत आहे. बांगलादेशातील अनेक दहशतवादी हल्ल्यांमागे 'जेएमबी' असल्याचे समोर आले आहे. 'आरसा'सारखे गट क्षेत्रीय शांततेसाठी धोकादायक आहेत, असे भारत सरकारने स्पष्ट केले आहे. मात्र, अनेकांनी भारताच्या भूमिकेवर शंका उपस्थित केली आहे. मात्र, भारत सद्यस्थितीला माओवादी, खलिस्तान चळवळ, ईशान्येकडील फुटीरतावादी संघटनांच्या विरोधात लढत आहे. त्यात आणखी एका संघटनेची भर नको म्हणून केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी रोहिंग्या शरणार्थी नसून, ते बेकायदा घुसखोर असल्याचे म्हटले आहे.

म्यानमारमधील बौद्ध व रोहिंग्या यातील संघर्षांचे पडसाद इतर देशांतही उमटले आहेत. हिब्ज-ए-इस्लामी, जमाते इस्लामी, हरकत-उल-जिहाद या जहाल दहशतवादी संघटना सक्रिय झाल्या आहेत. इंडोनेशियात फोरम-उमाल-इस्लाम नावाची एक दहशतवादी संघटना आहे. या संघटनेने म्यानमारमधील बौद्धांविरुद्ध जिहादची घोषणा केली आहे. जकार्तामध्ये म्यानमार दूतावासाची इमारत बॉम्बने उडविण्याचा प्रयत्न केला गेला. रोहिंग्यांवर होणाऱ्या हल्ल्याच्या निषेधार्थ रझा अकादमीने मुंबईत २०१२मध्ये मोर्चा काढला होता. बुद्धगयामध्ये त्यानंतर बॉम्बहल्लाही झाला होता. रोहिंग्यांमध्ये 'रोहिंग्या सॉलिडॅरिटी ऑर्गनायझेशन' ही दहशतवादी संघटना तीन दशकांपासून कार्यरत आहे. या संघटनेने अल-कायदा, लष्कर-ए-तय्यबा, इस्लामिक स्टेट या दहशतवादी संघटनांशी संधान बांधले आहे. केंद्रीय गुप्तचर विभागास याबद्दलची अधिकृत माहिती प्राप्त झाली आहे. भारतात जम्मू-काश्मीरमध्ये पाक पुरस्कृत दहशतवादी रोहिंग्यांच्या संपर्कात आहेत, अशीही माहिती उपलब्ध झाली आहे. बांगलादेशाने रोहिंग्यांना तात्पुरता निवारा दिला आहे, परंतु, म्यानमारने रोहिंग्यांना आपल्या देशात परत घेतले पाहिजे, असे बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना त्यांनी तितक्याच ठामपणे सांगितले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने रोहिंग्यांबद्दल घेतलेली भूमिका चुकीची आहे, असे म्हणता येणार नाही. रोहिंग्यांना पुन्हा रखाइन प्रांतात पाठविण्यासाठी बांगलादेश आणि म्यानमारमध्ये एक करार झाला आहे. हा रोहिंग्याच्या पुनर्वसनाबाबत पहिलाच करार आहे. म्यानमारने ही रोहिंग्यांना लवकरच माघारी आणण्यास तयार असल्याचे म्हटले आहे, हीच या प्रश्नावरील आजपर्यंतची समाधानकारक आणि आशादायी बाब आहे. दरम्यान, रोहिंग्या समस्येचे गांभीर्य सर्वांनाच कळले आहे व ते मान्य ही आहे. ही समस्या गंभीर असली तरी, आपल्या देशाच्या सुरक्षिततेचा, एकतेचा, अखंडताही तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे रोहिंग्या प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, मानवी हक्क, भारतीय उपखंडाची सुरक्षा, परराष्ट्र धोरण, अंतर्गत सुरक्षा आणि देशाचे हितसंबंध, राजकीय पक्षांची भूमिका, या सर्व मुद्द्यांवर संशोधन व्हावे, या हेतूने हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

संशोधन साहित्याचा आढावा

रोहिंग्या मुस्लिमांच्या प्रश्नावर मानवाधिकार, त्यांचे नागरिकत्व, म्यानमार सरकार आणि सू की यांची भूमिका, नरसंहार आदी दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत, शोधनिबंधही सादर करण्यात आले आहेत. विविध संस्था, संघटनांचे अहवाल ही याच विषयांवर प्रकाश टाकतात. मात्र, भारताच्या दृष्टिकोनातून या प्रश्नावर प्रकाश टाकणारी पुस्तके, शोधनिबंध, अहवाल दुर्मिळ आहेत.

अझीम इब्राहिम यांच्या फेब्रुवारी २०१८मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'द रोहिंग्या, इनसाइड म्यानमार हिडन जीनोसाइड,' या पुस्तकात संयुक्त राष्ट्रांचा हवाला देऊन रोहिंग्या मुस्लिम जगातील सर्वाधिक अत्याचार सहन करीत असलेला अल्पसंख्याक समूह असल्याचे म्हटले आहे. स्थानिक प्रसारमाध्यमांनी आवाज उठवून ही जागतिक शांततावादी नेत्या आंग सान सू की यांच्या नेतृत्वाखालील सरकारने त्यांच्या नरसंहाराकडे दुर्लक्ष केले आहे. प्रसारमाध्यमांमुळेच २०१७मधील भयानक नरसंहारक उघडकीस आला. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनांनी या नरसंहारप्रकरणी म्यानमार सरकारला दोषी धरले आहे. म्यानमारमधील सूचीबद्ध, मान्यता प्रात १३५ समूहात रोहिंग्यांना स्थान नसल्याने त्यांना बेकायदा ठरविले गेल्याने हा प्रश्न निर्माण झाल्याचेही इब्राहिम यांनी म्हटले आहे.

मोहमंद अब्दुल बारी यांच्या जून २०१८मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'द रोहिंग्या क्रायसिस' या पुस्तकातील माहितीनुसार, रखाइनमधील रोहिंग्यानी आपल्यावर होत असलेल्या अन्यायामुळे रखाइनमधून पळ काढून बांगलादेशात आश्रय घेतला, असे म्हटले आहे. म्यानमरमध्ये त्यांचे नागरिकत्व, धर्म, वेगळेपण नाकारले जात आहे. बांगलादेशात जाताना अनेकांचा मृत्यू झाला. मुली-महिलांवर बलात्कार झाले आहेत. म्यानमारमध्ये रोहिंग्याचा नरसंहारच झाला आहे, असा दावाही त्यांनी केला आहे. बांगलादेशातही त्यांना अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगावे लागत आहे. संयुक्त राष्ट्रांनी पुढाकार घेऊन त्यांना नागरिकत्व, हक्काचा अधिवास आणि जीविताची शाश्वती दिली पाहिजे, असे ही बारी यांनी म्हटले आहे.

प्रा. सव्यसाची बसू राय चौधरी आणि रणबीर सामाद्दार यांनी संपादित केलेल्या 'द रोहिंग्या इन साउथ आशिया,' या पुस्तकात नागरिकत्व नसलेला अल्पसंख्याक समूह म्हणून रोहिंग्यांची ओळख जगभर आहे. २०१७मधील हिंसाचारानंतर रखाइनमधून मोठ्या संख्येने स्थलांतर झाले. सुमारे पाच लाख रोहिंग्यांनी आजघडीला बांगलादेशात आश्रय घेतला आहे. बांगलादेशात अत्यंत हलाखीचे, गरिबीचे जीणे जगत आहेत. कुपोषण, देशात संचार करण्यास मनाई, त्यांना काम करण्यास, नोकरी करण्यास मनाई

आहे. बांगलादेशप्रमाणे रोहिंग्या दक्षिण आशियातील विविध देशात स्थलांतरित झालेले आहेत. मात्र, त्यांना आता तुम्ही माघारी कधी जाणार, असा प्रश्न विचारला जात आहे. म्यानमारमध्ये नागरिकत्व आणि भेदभाव न होण्याची कोणतीच हमी दिली जात नाही. नागरिकत्व आणि राज्यविहीन असलेल्या रोहिंग्यांना मानवाधिकार, मानवतावादी मदतीची गरज आहे, असे म्हटले आहे.

८ नोव्हेंबर २०१७ रोजी प्रसिद्ध झालेल्या अमेरिकेच्या 'काँग्रेशनल रिसर्च सर्व्हिस'च्या अहवालात पुढील बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे, रखाइनमधील २०१७च्या हिंसाचारात रोहिंग्यांची घरे, शेती, गावे जाळण्यात आली. पत्रकार, अभ्यासकांना रखाइनमध्ये जाण्यास बंदी आहे. हिंसाचारानंतर बांगलादेशात सुमारे ७-९ लाख रोहिंग्यांनी आश्रय घेतला आहे. त्यांना तातडीने मानवतावादी मदतीची गरज आहे. रखाइनमध्ये जाळपोळ करण्यात आल्याने रोहिंग्या इतक्यात माघारी जाणार नाहीत. म्यानमार सरकारने माघारी जाण्यासाठी पोषक परिस्थिती निर्माण करणे आवश्यक आहे. एकीकडे म्यानमार सरकार त्यांना आपले नागरिकच मानत नाही, तर दुसरीकडे बांगलादेशाच्या सोयी-सुविधांवर मोठा ताण आला आहे, त्यामुळे हा प्रश्न सोडविणे ट्रम्प सरकारपुढे एक मोठे आव्हान आहे, असेही अहवालात म्हटले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

वरील पार्श्वभूमीवर असलेल्या या प्रस्तुत अभ्यास विषयाची अर्थपूर्ण मांडणी समाजशास्त्रीय संशोधनाच्या चौकटीत करण्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१) निर्वासितांबाबत भारताच्या ऐतिहासिक भूमिकेचा आढावा घेऊन, समकालीन भूमिका आणि त्या मागील कारणांचा आढावा घेणे.

२) रोहिंग्या मुस्लिमांचा प्रश्न निर्माण होण्यामागील आणि हा प्रश्न न सुटण्यामागील कारणांचा आढावा घेणे.

३) भारतातील रोहिंग्यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करून नेमक्या परिस्थितीचा आढावा घेणे.

४) रोहिंग्या प्रश्नाविषयी राजकीय पक्ष, दबावगट, धार्मिक संघटना, सुप्रीम कोर्टाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

५) भारतातील रोहिंग्या देशाच्या सर्वांगिण विकासातील अडथळा आहेत का? ते देशाच्या एकता, अखंडता आणि अंतर्गत सुरक्षेला धोका आहेत का? त्यांची भूमिका फुटीरतावादी आहे का? याचा अभ्यास करणे.

६) म्यानमार, बांगलादेश आणि भारतातील रोहिंग्यांचा दहशतवादी संघटना, फुटीरतावादी गटांशी काही संबंध आहे का? जागतिक समुदाय आणि संयुक्त राष्ट्रांची या बाबत काय भूमिका आहे, याचा अभ्यास करणे.

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती (अभ्यास क्षेत्र, कालावधी)

म्यानमारमधून विस्थापित म्हणून रोहिंग्या मुस्लिम बांगलादेश, भारत, मलेशिया, थायलंड, इंडोनेशिया आदी देशांत गेले असल्याने या प्रश्नाची व्याप्ती मोठी आहे. भारताच्या विविध भागात रोहिंग्या बेकायदा राहत असल्याने साधारणपणे संपूर्ण भारत, म्यानमार आणि बांगलादेशातील घटना-घडामोडींपर्यंत विषयाची व्याप्ती आहे. शिवाय हा विषय आंतरराष्ट्रीय पातळीवर गेला असल्याने आणि संयुक्त राष्ट्रासह जगातील अन्य देशांनी भूमिका घेतल्याने या विषयाची व्याप्ती जागतिक झाली आहे. परिणामी, रोहिंग्या प्रश्न व्यापक झाला आहे. या विषयाला सामाजिक, आर्थिक, राजकीय, वांशिक, धार्मिक आणि आंतरराष्ट्रीय राजकारण आदी आयाम असल्याने हा विषय आंतरविद्याशाखीय झाला आहे. तथापि अभ्यासाच्या सोयीसाठी भारत, म्यानमार आणि बांगलादेश यांच्याशी निघडीत प्रश्नाचा उहापोह प्राधान्याने प्रस्तुत अभ्यासात केला जाणार आहे. तसेच हा प्रश्न म्यानमारच्या स्वातंत्र्यापासून म्हणजे १९४८पासून सुरू झाला आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचा कालावधी १९४८ते २०१९, असा असेल. या काळात रोहिंग्या मुस्लिम प्रश्न कसा निर्माण झाला आणि तो सोडविण्यासाठी ब्रिटिश, म्यानमार, भारत आणि बांगलादेश सरकारची भूमिका, धोरणे आणि निर्णय आदींचा आढावा प्रस्तुत अभ्यासात घेतला जाणार आहे.

संशोधनाची गृहितके

१) रोहिंग्या मुस्लिमांचा प्रश्न म्यानमारने प्रामाणिकपणे हताळला नाही. म्यानमार सरकार, जागतिक शांततावादी नेत्या आंग सान सू की यांची भूमिका वादग्रस्त राहिली आहे. म्यानमार सरकार या प्रश्नाकडे केवळ राष्ट्रवादी दृष्टिकोनातून पहाते, त्यांनी रोहिंग्याच्या मूलभूत हक्काकडे दुर्लक्ष केल्याने आज या प्रश्नाने उग्ररूप धारण केले आहे.

२) रखाइन प्रांतात रोहिंग्या मुस्लिमांनी स्थानिक बौद्ध आणि हिंदूंवर अन्याय-अत्याचार केला आहे. मुस्लिम धर्माचा प्रसार-प्रचार आणि प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न केल्याने म्यानमारमधील कट्टर राष्ट्रवादी बौद्धांनी रोहिंग्यांविरोधात आक्रमक पावले उचलली आहेत.

३) रखाइनमधील रोहिंग्या मोठ्या संख्येने (सुमारे चार लाख) बांगलादेशात विस्थापित झाल्याने बांगलादेशातील पायाभूत सुविधांवर मोठा ताण आला आहे. अंतर्गत कायदा-सुव्यवस्था अडचणीत आली आहे. शिवाय बांगलादेशातील जमात-उल मुजाहिदीन (जेएमबी) या दहशतवादी संघटनेत अनेक रोहिंग्या सक्रिय असल्याची माहिती पुढे आली आहे. ही संघटना पश्चिम बंगालमध्ये पाय पसरू पाहत आहे. बांगलादेशातील अंतर्गत परिस्थितीचा भारतावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होणार आहे.

४) रोहिंग्या सॉलिडॅरिटी ऑर्गनायझेशन आणि जमात-उल मुजाहिद्दीन (जेएमबी) या संघटना पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनांच्या संपर्कात आहेत. दहशतवादी संघटनांच्या या हातमिळवणीमुळे भारत, भारतीय उपखंड आणि जागतिक समुदायासमोर नवे आव्हान तयार झाले आहे. परिणामी, रोहिंग्या प्रश्न जागतिक दहशतवादाशी जोडला गेला आहे.

५) बांगलादेशातून भारतात आलेल्या बेकायदा घुसखोरांच्या प्रश्नाने आता उग्ररूप धारण केले आहे. २०१४ आणि २०१९च्या लोकसभा निवडणुकीत हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. देशात सुमारे चाळीस हजार रोहिंग्या राहत आहेत. या बेकायदा घुसखोरांमुळे देशातील पायाभूत सोयी-सुविधांवर ताण येत आहे. देशाच्या विकासात हे बेकायदा घुसखोर अडथळा ठरत आहेत.

६) बेकायदा घुसखोर असलेल्या रोहिंग्यांनी बनावट आधारकार्ड, मतदारकार्ड तयार करण्याच्या घटना (हैदराबादमध्ये) समोर आल्या आहेत. काही रोहिंग्यांवर किरकोळ स्वरुपाचे गुन्हेही नोंद आहेत. शिवाय गुप्तचर संस्थांनी रोहिंग्यांपासून देशाची एकता, अखंडता, सुरक्षेला धोका असल्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे.

७) संयुक्त राष्ट्रांसह अन्य आंतराराष्ट्रीय संस्था-संघटनांच्या मदतीने रोहिंग्यांना सुरक्षित आणि सुखरूप म्यानमारमध्ये पाठविणे शक्य आहे.

संशोधनाची अभ्यास पद्धती

प्रस्तुत अभ्यासासाठी प्रामुख्याने विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. रोहिंग्यांचा हा प्रश्न बहुआयामी, आंतरविद्याशाखीय आणि महत्त्वाचा असूनही, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावीपणे हाताळला नाही. या पार्श्वभूमीवर, प्रस्तुत अभ्यासात रोहिंग्या मुस्लिमांची नेमकी स्थिती आणि समस्या समजून घेऊन त्यावर उपाय सुचविणार असल्यामुळे हे उपयोजित संशोधन असणार आहे. रोहिंग्यांच्या प्रत्यक्ष संख्येवर संशोधन होणार असल्याने संशोधन संख्यात्मक ही असणार आहे. भारतात रोहिंग्या मोठ्या संख्येने राहत असलेल्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पहाणी, मुलाखती घेणार असल्याने हा अभ्यास अनुभवजन्य असणार आहे. संशोधनातून मिळालेली माहिती, घटनास्थळांचे प्रत्यक्ष निरीक्षण, वस्तुस्थिती आणि मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात येणार असल्याने प्रस्तुत अभ्यासात विश्लेषणात्मक संशोधन पद्धत वापरण्यात येणार आहे. रोहिंग्यांच्या इतिहासाचा आढावा घेण्यात येणार असल्याने संशोधन ऐतिहासिकही असणार आहे. एकूण प्रस्तुत अभ्यास पूर्ण करण्यासाठी उपयोजित, संख्यात्मक, ऐतिहासिक, अनुभवजन्य आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धत वापरण्यात येईल. प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी खालील प्राथमिक आणि दुय्यम माहिती स्रोतांचा वापर करण्यात येईल.

माहितीचे प्राथमिक स्रोत

१) देशात रोहिंग्या राहत असलेल्या विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन, त्यांच्याशी बोलून, मुलाखती घेऊन त्यांची नेमकी लोकसंख्या, त्यांचे प्रश्न, म्यानमारमध्ये त्यांच्यावर नेमके काय अन्याय-अत्याचार झाले. ते भारतात कसे आणि कोणत्या मार्गाने आले. जम्मू, हैदाबाद सारख्या शहरातच का आणि कसे स्थायिक झाले. त्यासाठी त्यांना कोणी आणि कशी मदत केली. या माहिती घेण्यात येईल. हा संशोधनाचा प्राथमिक माहिती स्रोत असेल.

२) म्यानमारमधील रखाइन प्रांत आणि बांगलादेशमधील रोहिंग्या निर्वासितांच्या छावण्यांना प्रत्यक्ष भेट देण्याचा प्रयत्न करणार आहे. भूतकाळातील घटना, प्रत्यक्ष घटना, घडामोडींची माहिती घेण्याचे नियोजन आहे. रखाइनमधील स्थानिक बौद्ध आणि हिंदूंशी चर्चा करून त्यांच्यावर रोहिंग्यांनी नेमका कशा प्रकारे अन्याय केला, याची माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. हा संशोधनाचा प्राथमिक माहिती स्रोत असेल.

माहितीचे दुय्यम स्रोत

१) म्यानमारमधील काही राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी, संयुक्त राष्ट्राच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्राथमिक माहितीचे संकलन करून तिचे विश्लेषण करण्यात येईल.

२) म्यानमार सरकार, बांगलादेश सरकार, भारत सरकार, संयुक्त राष्ट्राच्या विविध संस्थांचे अहवाल मिळवून त्यातील मजकूराचे विश्लेषण करण्यात येईल.

३) रोहिंग्या प्रश्नावर जगभरात अनेक शोधनिंबध प्रकाशित झाले आहेत. विविध संस्थांनी आपले अहवाल प्रसिद्ध केले आहेत. या शोधनिबंध आणि संस्थांच्या अहवालाचा संशोधनासाठी उपयोग करण्यात येईल.

४) विविध वृत्तवाहिन्या आणि वृत्तसंस्थांतील वृत्त, वृत्त मालिका आणि विशेष वृत्तांचा, अहवालांचा, या विषयांवर काम केलेले पत्रकार, अभ्यासक, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा दुय्यम माहितीचे स्रोत म्हणून उपयोग करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधनाची मर्यादा

रोहिंग्या प्रश्न जागतिक झाल्याने हा प्रश्न व्यापक झाला आहे. हे व्यापकत्वच संशोधनातील एक मोठी मर्यादा आहे. रोहिंग्याची भाषा आणि त्यांचे भौगोलिक स्थान ही संशोधनातील दुसरी मोठा मर्यादा असणार आहे. या प्रश्नावर जगभरातील विविध विद्यापीठे, संशोधन संस्था आणि वृत्तवाहिन्या आणि प्रसारमाध्यमांनी हा विषय मानवाधिकाराच्या दृष्टिकोनातून हाताळला आहे. त्यामुळे रोहिंग्यांचा मानवाधिकार, नागरिकत्व यादी बाबींवर विपुल प्रमाणात संशोधन, लिखाण झाले आहे. पण, प्रस्तुत अभ्यास मी भारताच्या दृष्टिकोनातून करणार आहे. मात्र, या विषयाचे भारताच्या दृष्टिकोनातून अद्याप फारसे संशोधन झाले नाही. त्यामुळे संशोधनासाठी संदर्भ साहित्याची उपलब्धता अत्यंत कमी किंवा दुर्मिळ आहे. या विषयाचा अभ्यास अंतर्गत सुरक्षा, दहशतवाद, फुटीरतावादाच्या अंगाने होणार आहे. मात्र, या संबंधी गृह मंत्रालय आणि गुप्तहेर संस्थांचे महत्त्वाचे (गोपनीय) अहवाल मिळणे जवळपास अशक्य आहे. संबंधित तज्ज्ञांशी चर्चा करून जी माहिती मिळेल त्याच माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढावा लागणार आहे. त्यामुळे भारतीय दृष्टिकोनातून अभ्यास करताना पूरक संशोधन साहित्याची मोठी कमतरता असणार आहे.

संशोधन प्रकरणाची माहिती

प्रस्तुत संशोधनाच्या प्रकरणाची मांडणी खालील प्रमाणे असेल.

प्रकरण : १ प्रास्ताविक (रोहिंग्या मुस्लिमांच्या प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमी)

रोहिंग्यांचा इतिहास, म्यानमारमधील अधिवास, ब्रिटिश वसाहत काळातील त्यांची भूमिका, रोहिंग्या-बौद्ध संघर्ष वाढण्याची कारणे, म्यानमारचा राष्ट्रवाद, रखाइन प्रांतातील सध्यस्थिती, म्यानमार सरकारकडून रोहिंग्यांच्या पुनर्वसनासाठी उचलण्यात आलेली पावले. म्यानमार सरकार आणि आंग सान सू की यांची भूमिका.

प्रकरण : २ संदर्भ साहित्याचा आढावा

रोहिंग्या मुस्लिम प्रश्नावर लिहिलेली पुस्तके, म्यानमारचा इतिहास, म्यानमार सरकार, संयुक्त राष्ट्रे, विविध आंतरराष्ट्रीय संस्था, संघटनांचे अहवाल, विविध विद्यापीठांमधून झालेल्या संशोधनाचा आढावा

प्रकरण : ३ आंतरराष्ट्रीय पातळीवरील रोहिंग्या प्रश्न

आंतरराष्ट्रीय पातळीवर रोहिंग्या मुस्लिम प्रश्नाची नेमकी व्याप्ती, विविध देश, संस्था, संघटना, संयुक्त राष्ट्रे आणि रिफ्युजी एजन्सींची भूमिका आणि त्यांनी उचलेली पाउले. रोहिग्या प्रश्नांचे आंतरराष्ट्रीय पाततळीवरील भवितव्य.

प्रकरण : ४ भारतातील रोहिंग्या आणि त्यांची सद्यस्थिती

भारतात आजघडीला किती रोहिंग्या राहतात, भारतात ते कधीपासून आणि कोणत्या मार्गाने आणि कसे येत आहेत, आजघडीला ते देशात कोठे आणि कसे राहत आहेत, स्थानिक पातळीवर त्यांना कोण आणि कशी मदत करीत आहे, केंद्र सरकारची भूमिका, सुप्रीम कोर्टाची भूमिका, याचिकादारांची भूमिका, राजकीय पक्षांची भूमिका.

प्रकरण : ५ रोहिंग्या मुस्लिम आणि भारताची अंतर्गत सुरक्षा

रोहिंग्यांमुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेला खरोखरच धोका आहे का. गुप्तहेर संस्था, गृह मंत्रालयाचे अहवाल काय सांगतात. रोहिंग्या राहत असलेल्या छावण्यांमध्ये कोणत्या घडामोडी घडतात. त्यांचे भारताविषयीचे मत, मानसिकता काय आहे.

प्रकरण : ६ सारांश, निष्कर्ष आणि उपाययोजना

प्रत्यक्ष माहिती, प्राथमिक आणि दुय्यम माहितीचे विश्लेषण. राष्ट्रवादी, अराष्ट्रवादी (राष्ट्रवाद ही संकल्पना मान्य नसणारे), जागतिक शांततावादी, मानवतावादी, सौम्य राष्ट्रवादी (कॉँग्रेस), प्रखर राष्ट्रवाद्याची भूमिका (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपसारख्या उजव्या विचाराच्या संस्था-संघटना). आंतराष्ट्रीय पातळीवरील प्रश्नाची नेमकी स्थिती,, संशोधनाचा सारांश, अभ्यासकाची मते आणि एकूण संशोधनाचे सविस्तर विश्लेषण.

संदर्भग्रंथ सूची

१) अझीम इब्राहिम, १ फेब्रुवारी २०१८, द रोहिंग्या, इनसाइड म्यानमार हिडन जीनोसाईड, हार्टस् पब्लिकेशन, लंडन.

२) मोहमंद अब्दुल बारी, १९ जून २०१८, द रोहिंग्या क्रायसिस, क्युबे पब्लिशिंग लि. लीसस्टरशायर, अमेरिका.

३) संपादक प्रा. सव्यसाची बसू राय चौधरी आणि रणबीर सामाद्दार, द रोहिंग्या इन साउथ आशिया, रुटलेज पब्लिकेशन, नवी दिल्ली.

४) https://www.bbc.com/hindi/international-41316498

५) https://www.bbc.com/hindi/international-41157661 (रवि नायर बीबीसी, ५ सप्टेंबर २०१७)

६) https://www.bbc.com/hindi/international-42348733 (१४ डिसेंबर २०१७)

७) https://www.bbc.com/hindi/international-41249993 (१३ सप्टेंबर २०१७)

८) https://www.bbc.com/hindi/international-41263342 (१४ सप्टेंबर २०१७)

९) https://www.bbc.com/hindi/international-41297552 (१७ सप्टेंबर २०१७)

१०) https://www.bbc.com/hindi/india-41379206 (२५ सप्टेंबर २०१७)

११) https://www.loksatta.com/vishesh-news/marathi-articles-on-rohingya-muslims-crisis-1564438/ (October 5, 2017)

१२)https://www.loksatta.com/vishesh-news/national-security-important-than-rohingya-crisis-1556564/

१३) https://www.bbc.com/hindi/international-41174259

१४) http://www.thestateless.com/contact

१५) https://www.aljazeera.com/indepth/features/2017/08/rohingya-muslims-170831065142812.html

१६) http://www.rohingya.org/portal/

१७) https://www.ndtv.com/india-news/supreme-court-refuses-to-stop-deportation-of-7-rohingya-to-myanmar-today-1926544

१८) https://fas.org/sgp/crs/row/R45016.pdf

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पंजाब चव्हाण

(एम. ए. पीएच. डी.)

प्राचार्य दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर

ता. भोकर. जि. नांदेड

संशोधक

दत्तात्रय भानुदास जाधव

एम. ए., एम. फिल, सेट,

राज्यशास्त्र